**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.८९८/२०२२**
**जूना नि.फौ.ख.क्र. ४२३/२०२०**
**सरकार -वि- संदीप सुभाषराव नवलकार**
नि. क्र. १४ लगत
CNR No. MHAM120019722020

## न्यायनिर्णय

( घोषीत दिनांक ०५ ऑगस्ट, २०२६ )

युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुत खटल्यात खालील मुद्दे निष्कर्षासाठी उपस्थित झालेले आहेत. त्यावरील माझे निष्कर्ष कारणमिमांसेसहीत खालील प्रमाणेः-

| **अ.क्र** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | दिनांक १३.०९.२०२० रोजी १८.१५ ते १८.४५ वाजेच्या सुमारास मौजे सांगळूद, ता. दर्यापूर, जिल्हा अमरावती येथील आरोपीने त्याच्या घरातील स्वयंपाक खोलीमध्ये नायलॉन थैलीमध्ये देशी दारू बॉबी संत्रा कंपनीच्या १८० मिलीच्या एकूण १३ बाटल्या विनापरवाना बेकायदेशिररीत्या अवैध विक्री करण्याच्या उद्देशाने बाळगल्या व त्याद्वारे त्याने महाराष्ट्र दारुबंदी कायद्याच्या कलम ६५ (ई) अन्वये गुन्हा केल्याचे, अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय ? | नाही. |
| २. | काय आदेश? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

### मुद्दा क्रमांक १ करीता-

२) आरोपीविरुध्द आरोप सिध्द करण्याकामी अभियोग पक्षाने घटनास्थळ व जप्ती पंचनाम्यावरील पंच सा. क्र. १ अजय संजय गावंडे व पंच सा.क्र. २ धीरज गोविंदराव खंडारे याची साक्ष नोंदविली. त्यानंतर अभियोग पक्षाचा साक्षीपूरावा नि.क्र. ०१ वरील आदेशान्वये बंद करण्यात आला. आरोपीविरूध्द पुरावा मिळून न आल्याने त्याचे फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३१३ अन्वये निवेदन नोंदविण्यात आले नाही. पंच अजय व धीरज यांच्या साक्षीत असे आले आहे की, ते आरोपीला ओळखत नाहीत. दिनांक १३.०९.२०२० रोजी पोलीसांनी त्यांना पंचनाम्यासाठी कुठेही बोलाविले

नव्हते. पोलीसांनी त्यांच्यासमक्ष कोणतीही कारवाई केली नाही. पंच अजय याने सांगळूद येथील बस स्टॅन्डवर पंचनाम्यावर सही केली होती. मात्र पंच धीरज याची पोलीसांनी पंचनाम्यावर कुठे सही घेतली होती हे त्याला आठवले नाही. घटनास्थळ/जप्ती पंचनाम्यावरील सह्या त्यांच्या असल्याचे त्यांनी मान्य केले. परंतू त्यातील मजकूराबाबत त्यांना काहीही सांगता आले नाही.

३) दोन्ही पंचांनी अभियोग पक्षास समर्थन न केल्याने वि. सरकारी अभियोक्त्यांनी न्यायालयाच्या परवानगीने त्यांना उत्तर सुचक प्रश्न विचारले. त्यात त्यांनी दिनांक १३.०९.२०२० रोजी येवदा पोलीसांनी त्यांना सांगळूद येथील आरोपीच्या घरी घटनास्थळ/जप्ती पंचनाम्यासाठी बोलाविले होते, त्यावेळी पोलीसांनी आरोपीच्या घरातील नायलॉन थैलीत ठेवलेल्या देशी दारू बॉबी संत्रा कंपनीच्या प्रत्येकी १८० मिलीच्या १३ बाटल्या जप्त केल्या, त्याचा पोलीसांनी त्यांच्यासमक्ष पंचनामा केला, तो त्यांना वाचून दाखविला व त्यानंतर त्यांनी त्यावर सह्या केल्या, त्यावेळी पोलीसांनी जप्त मुद्देमालापैकी एक बाटली रासायनिक तपासणी कामी त्यांच्यासमक्ष वेगळी काढली, दिनांक १७.०९.२०२० रोजी पोलीसांनी त्यांचे बयान नोंदविले होते, इत्यादी बाबी त्यांनी नाकारल्या आहेत. त्यांना त्यांच्या बयानातील रेखांकीत भाग 'अ' वाचून दाखविण्यात आले असता त्यांनी ते पोलीसांना सांगितले नव्हते. परंतू ते त्यात का आहे याचे कारण ते सांगू शकले नाहीत.

४) उपरोक्त साक्षीदारांची साक्ष पाहता गुन्ह्यातील जप्त मुद्देमाल आरोपीच्या ताब्यातून जप्त करण्यात आला हे निःसंशयपणे सिध्द होत नाही. तसेच खटल्यातील लेखी रिपोर्ट, प्रथम खबरी अहवाल, सी.ए.फॉर्म इत्यादी महत्वाचे दस्त सिध्द झाले नाहीत. जरीही या साक्षीदारांनी त्यांच्या साक्षीत घटनास्थळ / जप्ती पंचनाम्यांवर त्यांच्या सह्या असल्याचे सांगितले असले तरीही त्यातील मजकुरांबाबत त्यांना काहीही सांगता आले नाही. सदर प्रकरणात रासायनिक परीक्षण अहवाल प्राप्त झालेला आहे. परंतू तो सिध्द झाला नाही. पंचांनी अभियोग पक्षास समर्थन न केल्याने आरोपीचा जप्त मुद्देमालाशी संबंध असल्याबाबत कुठलाही सबळ पुरावा अभिलेखावर आला नाही.

त्यामुळे अभियोग पक्षाने आरोपीविरुध्द लावण्यात आलेल्या कलमामधील संपुर्ण घटक सिध्द करणारा कुठलाही पुरावा न्यायालयासमोर न आल्याने आरोपी निर्दोष मुक्त होणेस पात्र आहे. या कारणास्तव मी मुद्दा क्रमांक १ चे निष्कर्ष नकारार्थी देत मुद्दा क्र.२ च्या उत्तरादाखल खालील आदेश पारित करीत आहे.

## <u>आ दे श</u>

१) आरोपीची फौजदारी प्रक्रिया संहितेच्या २५५(१) अन्वये महाराष्ट्र दारुबंदी कायद्याच्या कलम ६५ (ई) खालील अपराधातून निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२) आरोपीचे जामीन बंधपत्रे रद्द करण्यात येतात.

३) जप्त मुद्देमाल - प्रत्येकी १८० मी.ली. क्षमतेच्या देशी दारू बॉबी संत्रा कंपनीच्या १३ बाटल्या अपील कालावधीनंतर राज्य उत्पादन शुल्क विभाग, अमरावती यांच्या कार्यालयाकडे पुढील कार्यवाहीस्तव पाठविण्यात याव्यात.

४) आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३७-अ अन्वये निशाणी २४ वर दिलेले बंधपत्र आजपासून सहा महिन्यांच्या कालावधीकरीता अंमलात राहील.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.)

SAMEER DILIP KAMALAKAR
Digitally signed by SAMEER DILIP KAMALAKAR
Date: 2026.08.05 15:03:34 +0530

दिनांकः ०५.०८.२०२६

(स. दि. कमलाकर)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
दर्यापूर.